दैनिक वृत्तपत्र

# मेट्रो सिटी वृत्तांत

विश्वसनीय • वेगवान • प्रभावी

संपादक - रुवी हुसैन | RNI NO. 2021/51259 | दिनांक - 25.05.2026

# पावसाळ्यापूर्वी नागरिकांच्या समस्यांवर 'ऑन द स्पॉट' तोडगा!

## महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत समन्वय बैठकीत विविध प्रश्नांवर चर्चा

**पिंपरी-चिंचवड, 25 मे 2026 :**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक 10 मधील नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्यावर तातडीने, जागेवरच उपाययोजना करण्यासाठी श्री सिद्धिविनायक मंदिर, संभाजीनगर येथे विशेष समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले.

ही बैठक आमदार श्री. अमितजी गोरखे यांच्या नेतृत्वाखाली आणि नगरसेविका श्रीमती अनुराधाताई गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



नागरिकांनी महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर पावसाळ्यात उद्भवणाऱ्या समस्या, पाणी निचरा, रस्त्यांची दुरुस्ती, वाहतूक कोंडी, पार्किंग तसेच स्वच्छतेसंदर्भातील प्रश्न थेट मांडले. अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने कारवाई करून लवकरात लवकर निवारण करण्यांचे आश्वासन दिले.

> "प्रभागाचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांची सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. येणाऱ्या पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनासोबत समन्वय साधून प्रत्येक समस्येचे वेळेत निवारण केले जाईल.
>
> **– सौ. अनुराधाताई गोरखे,** नगरसेविका

### बैठकीला उपस्थित अधिकारी व विभाग

- स्थापत्य विभाग
- आरोग्य विभाग
- पाणीपुरवठा विभाग
- उद्यान विभाग
- विद्युत विभाग

सर्व वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित

### चर्चेत आलेल्या प्रमुख विषयांवर लक्ष

- स्ट्रोम वॉटर लाईन व पाणी निचरा
- उद्यान विभाग व झाडांची छाटणी
- विद्युत विभागाची कामे
- भटक्या कुत्र्यांचा वाढता त्रास कमी करणे
- वाहतूक व पार्किंगचे योग्य नियोजन

### तातडीने कारवाई करण्याचे निर्देश

- पाणी साचणाऱ्या भागात योग्य निचरा व्यवस्था करणे.
- रस्त्यांची दुरुस्ती व खड्डेमुक्ती मोहीम राबवणे.
- झाडांची छाटणी करून सुरक्षितता सुनिश्चित करणे.
- भटक्या कुत्र्यांवर नियंत्रणासाठी विशेष मोहीम राबवणे.
- वाहतूक कोंडी व पार्किंग समस्येवर शाश्वत उपाय योजना करणे.

### लोकप्रतिनिधींची उपस्थिती

या बैठकीला लोकप्रतिनिधी म्हणून पुढील मान्यवर उपस्थित होते आणि नागरिकांच्या मागण्यांचा पाठपुरावा केला.

- **सौ. सुप्रियाताई चांगुडे,** नगरसेविका
- **श्री. कुशाग्रदादा कदम,** नगरसेवक
- **श्री. तुषारभाऊ हिंगे,** नगरसेवक

### नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

प्रभागातील ज्येष्ठ नागरिक, महिला आणि जागरूक रहिवाशांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपले प्रश्न प्रशासनासमोर मांडले.



**नागरिकांच्या प्रश्नांवर 'ऑन द स्पॉट' तोडगा काढण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल!**

⚠ नागरिक संपर्क, समस्या नोंदवणी व तक्रार निवारणासाठी 'अ' क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधा.